भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.६०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०८/२०१७

**१) फेसबुकवर अश्लिल फोटो डाउनलोड करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०८/२०१७ चे ०९.१६ वा. दर. पर्यंत यातील आरोपी हिने फिर्यादीची पत्नीचा फोटो फेसबुकवरुन डाउनलोड करुन तो फोटो स्वत:चे आयडी वर टाकुन त्या फोटो खाली अश्लिल कॉमेन्टस केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम ३५४ (अ),(द),२९२ भांदवि. सहकलम ६७ (अ) माहिती तंत्र अधिनियम २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो. नी. ताजणे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीवर जबरजस्ती करण्याचा प्रयत्न करुन तिचे विडीओ क्लिप काढुन इतर मोबाईलवर वायरल करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०८/२०१७ ते २९/०८/२०१७ चे १०.१५ वा. दर. पर्यंत यातील आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगणमत करुन अल्पवयीन पिडीत फिर्यादी मुलीचा पाठलाग केला व तिला मोटार सायकलवर बसवुन घटनेच्या ठिकाणी घेवुन गेला व तिच्यावर जबरजस्ती करुन विनयभंग करण्याच्या प्रयत्न करुन शिवीगाळ केली व यातील आरोपी क्र.४ ते ८ यांनी बदनामी करण्याचे उद्देशाने तिचे विडीओ क्लिप काढुन गावातील इतर मोबाईलवर वायरल केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. आंधळगाव येथे कलम ३५४ (ब),३४१,५०४,३४ भांदवि. सहकलम ६६ (अ) माहिती तंत्र अधिनियम २००० सहकलम ८,११(२),१७ बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो. नी. गुरनुले पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) घरात प्रवेश करुन महिलेचा विनयभंग करुन कुऱ्हाडीचे दांडयाने मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/०८/२०१७ चे १९.०० ते १९.३० वा. दर. यातील फिर्यादीचे दिर आरोपी याने फिर्यादीचे घरात प्रवेश करुन तिला लज्जा वाटेल अश्या घानेरडया शब्दात बोलुन शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केला व तिला कुऱ्हाडीच्या दांडयाने मारहान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे ४५२, ३५४,३२३,५०९,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेसरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन शेतातुन पाणी नेण्याचे कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन बासाने काठीने मारुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०८/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन आपले शेतात फिर्यादीचे शेतातील पाणी नेतांनी दिसल्याने फिर्यादी व त्याचा मुलगा हर्षल वय १९ वर्ष, याने त्यांना हटकले असता तिन्ही आरोपीतांनी फिर्यादी व त्याचे मुलासोबत पाण्याचे कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन हाताबुक्यांनी व बासाचे काठीने फिर्यादीचे डोक्यावर व उजवे हाताचे मनगटावर मारुन गंभिर जखमी केले तसेच हर्षलला सुध्दा हाताबुक्यांनी मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी मोहन पांडुरंग कांबळे वय ५५ वर्ष, रा. कोदुर्ली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे ३२५,३२३,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पटले पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) किराणा दुकानातील नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २८/०८/२०१७ चे २०.४५ ते दिनांक २९/०८/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रभाकर दिवारुजी उपरकर वय ५४ वर्ष, रा. नेहरु वार्ड मोहाडी यांचे उपरकर किराणा ॲन्ड जनरल स्टोअर्स दुकानाचे कोणीतरी अज्ञात चोराने शटरचे ताले तोडुन आत प्रवेश करुन कॉउन्टरचे ड्रॉप मध्ये ठेवलेले नगदी २७,०००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक २९/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे तुमसर, गोबरवाही, साकोली भंडारा व लाखांदुर येथे दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभटटी दारु किंमती २०००/–रु. व ३४ लिटर ७४० मिली लिटर देशी दारु+ एक मोटार सायकल किंमती ६५,०३६/–रु. तसेच जुगारातुन किंमती ६२५/–रु. असा एकुण किंमती ६५,६६१/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.